दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.८ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १३५ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 8 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 135 • Pages 4 • Rate 4 Rs

### चुकीचे पाणीवाटप, कचरा व्यवस्थापन नीट नाही

**मुंबई**–पुणे आणि पिंपरी मध्ये नागरी समस्या खूप आहेत. अनेक प्रभागात रोड शो केला आहे. त्या त्या प्रभागातली उमेदवार सोबत होते. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. आज त्याचे रुपांतर मतदानामध्ये झाले पाहिजे, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे. पुणे आणि पिंपरीमध्ये नागरी समस्या आ वासून उभ्या आहेत. कचरा, आरोग्य सेवा, वाहतुकीची कोंडी, रस्त्यावर खड्डेच खड्डे आहे, पाण्याची अडचण आहे यावर काम करायचे आहे. टँकर माफियाची गँग आहे. कचरा वेळेवर उचलला जात नाही. रोज अनुभव आपल्या नागरिकांना येत आहे. कागदावर अनेक योजना आहेत. पुणे शहरातले नागरिक भरडले जात आहेत. चुकीचे पाणीवाटप केले जात आहे, कचरा व्यवस्थापन नीट नाही, असे पवार म्हणाले.

# बिनविरोध उमेदवारांमुळे काहींना मिरची लागतेय

## लोकसभेतही ३५ खासदार बिनविरोध आले होते–फडणवीसांचे विरोधकांना प्रत्युत्तर

### बिनविरोध निवडी हा चांगला पायंडा – बावनकुळे



दरम्यान, भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील बिनविरोध निवडींचे समर्थन करत, विरोधकांचे आरोप फेटाळून लावले होते. निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यापूर्वी राज्यात बिनविरोध सरपंच निवडून यायचे, तेव्हा आम्ही कधीच विरोध केला नाही. जनतेला विकास हवा आहे, म्हणून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे. बिनविरोध निवडीमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही. मग यात आक्षेप घेण्यासारखे काय? असा सवाल बावनकुळे यांनी विरोधकांना विचारला होता.




**धुळे (प्रतिनिधी)–धुळ्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. निवडणुकीच्या सुरुवातीलाच धुळेकरांनी भाजपचे चार नगरसेवक बिनविरोध निवडून देत चौकार मारला आहे. आमच्या विजयामुळे काही लोकांना मिरची लागत आहे, पण त्यांना मी एवढेच सांगेन की, तुमको मिर्ची लगी तो मैं क्या करू? असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा लगावला आहे. तसेच याआधी काँग्रेसच्या काळात लोकसभेत ३३ खासदार बिनविरोधत निवडून आले होते, असेही ते म्हणालेत.महानगरपालिका निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर विरोधकां कडून सत्ताधाऱ्यांवर आरोप सुरू आहेत. या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेत, त्यांच्यासमोर पुरावे सादर केलेत. तसेच हायकोर्टात देखील याचिका दाखल केली आहे. बिनविरोधी निवडी हा लोकशाहीचा खून असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे. या टीकेला फडणवीस यांनी आज धुळ्यातील सभेत बोलताना प्रत्युत्तर दिले आहे.**

महापालिका निवडणुकीत महायुतीचे ७० च्या आसपास उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी 'लोकशाहीचा खून' झाल्याची टीका केली होती. या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपले नगरसेवक बिनविरोध आल्यामुळे काही लोकांना मिरची लागत आहे. तुमको मिर्ची लगी तो मैं क्या करू? देशाच्या लोकसभेत ३५ खासदार बिनविरोध आलेत. त्यापैकी ३३ खासदार काँग्रेसच्या काळात आलेत.जर खासदार बिनविरोध आले, तर लोकशाही जिवंत आणि धुळेकरांनी चार नगरसेवक बिनविरोध दिले, तर लोकशाहीचा खून झाला, असे म्हणणाऱ्यांचे डोके कुठे आहे? हे सांगण्याची आवश्यकता नाही, अशी टीका फडणवीस यांनी केली. तसेच धुळेकरांचे प्रेम आम्ही स्वीकारतो. या धुळ्याचा विकास करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असेही ते म्हणालेत.

धुळे शहराबद्दल बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राचे प्रवेशद्वारे असलेले धुळे शहर आहे. या शहरामध्ये अनेक वर्षात विकासाचे काम न झाल्यामुळे शहराची अवस्था बिकट झाल्याचे बघितले आहे. २००३ स्थापन साली या महानगपालिकेने भाजपच्या काळातच पहिल्यांदा विकास बघितला.फडणवीस पुढे म्हणाले, धुळ्यात दर दहा दिवसांनी पाणी येत होते. आपण १७० कोटींची योजना पूर्ण केली. त्यानंतर आज धुळ्यात चांगल्या पद्धतीने पाणी मिळत आहे. आमचे स्वप्न एवढेच नसून, धुळ्यातील प्रत्येक



घरात, प्रत्येक दिवशी माझी माता, भगिनी आपला नळ उघडेल, तर पिण्याचे स्वच्छ पाणी आलेच पाहिजे, हे आमचे स्वप्न आहे. दोन वर्षांनी ही महानगपालिका रौप्य महोत्सव साजरा करणार आहे. या रौप्य महोत्सवी वर्षात भाजपच्या नेतृत्वात या महानगपालिकेला विकासाकडे नेण्याचा संकल्प करण्यासाठी मी आलो आहे.

## धडगाव तालुक्यात पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीची हत्या; मृतदेह दरीत फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील म्हसावद पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दारूच्या नशेत पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीचा संतापलेल्या नातेवाईकांनी खून केला असून, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह खोल दरीत फेकून दिला. या प्रकरणी म्हसावद पोलिसांनी दोन संशयितांविरुद्ध विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत किसन वेस्ता वळवी (वय ३५, राहणार वेलखेडीचा खेडीबारपाडा) याला दारूचे व्यसन होते. २८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास किसन हा दारू पिऊन आपल्या पत्नीला बेदम मारहाण करत होता. या मारहाणीचा राग आल्याने कुटुंबातील व परिसरातील नातेवाईक संतप्त झाले.



पत्नीला वाचवण्यासाठी गेलेल्या सायसिंग वेस्ता वळवी आणि दिनेश किसन वळवी यांनी किसनला रोखण्याचा प्रयत्न केला. वादावादीचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी सायसिंग वळवी याने किसनला हाताने बेदम मारहाण केली, तर दिनेश वळवी याने जवळच असलेल्या एका लाकडी डेंगाराने (काठीने) किसनच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. या गंभीर दुखापतीमुळे किसनचा जागीच मृत्यू झाला. खून केल्यानंतर ही घटना कोणाच्याही लक्षात येऊ नये, या उद्देशाने संशयितांनी कट रचला. त्यांनी किसनचा मृतदेह उचलून वेलखेडी परिसरातील पिंपळबार टेकडीच्या खोल दरीत फेकून दिला. अनेक दिवस उलटल्यानंतर ही घटना उघडकीस आली असून, ६ जानेवारी २०२६ रोजी खेत्या वेस्ता वळवी यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात संशयितां विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) (खून), २३८ (पुरावा नष्ट करणे) आणि ३(५) प्रमाणे नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा सविस्तर तपास सुरू असून, मृताचा मृतदेह शोधण्यासह संशयितांची चौकशी सुरू आहे. कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती तपास अधिकारी यांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे करत आहेत.

### बीडच्या पत्रकार शेख आयेशा यांचा मुंबईत वर्षा निवासस्थानी

## सौ.अमृता देवेंद्र फडणवीस यांनी केला वाढदिवस जल्लोषात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

बीड येथील लोकजगत च्यासंपादक शेख आयेशा यांनी अतिशय कमी कालावधीत पत्रकारिता क्षेत्रात आणि तृतीय पंथीयांसह सामाजिक कार्यात सुरू केलेले कार्य उल्लेखनीयआहे.यामुळेच आज मी माझ्या एका चांगल्या जिवलग मैत्रिणीचा वाढदिवस वर्षा निवासस्थानी साजरा केला असे प्रतिपादन वाढदिवसानंतर सौ. अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा देताना व्यक्त केले.मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या शासकीय वर्षा बंगल्यावर दि.१ जानेवारी रोजी पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस मुख्यमंत्री यांच्या सुविधा पत्नी तथा बँकर,सुप्रसिद्ध गायिका, अभिनेत्री आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या सौ.अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय वर्षा या बंगल्या वर वाढदिवस साजरा केला.यावेळी त्यांनी पत्रकार शेख आयेशा यांना शुभेच्छा देताना म्हटले की,तृतीय



पंथीयांच्या सक्षमीकरणा वर आणि अल्पसंख्याक समाजातील अन्यायग्रस्त महिलांना न्याय देण्यासाठी सुरू केलेला लढा निश्चितच कौतुकास्पद आहे.मला देखील सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांबद्दल कौतुक वाटते.एकाग्रामीण भागातून थेट मुंबई पर्यंत माझ्यासोबत त्यांनी जो विश्वास संपादन केला ही बाब नक्कीच कौतुकास्पद आहे.भविष्यात त्यांच्या आश्रय सेवाभावी संस्थेला आम्ही सामाजिक कार्य करत असलेल्या दिव्याज फाउंडेशन अंतर्गत निश्चित तृतीयपंथीयांसह महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करू असा विश्वास व्यक्त केला.वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ,शाल,श्रीफळ, भेटवस्तू आणि तोंड गोड करून वाढदिवस त्यांनी मोठ्या आनंदाने साजरा केला.वाढदिवसानिमित्त खास निमंत्रित करून कुठलेही नाते संबंध नसतानाही एका ग्रामीण भागातील वृत्तपत्र सृष्टीत काम करणाऱ्या महिलेला मैत्रिण म्हणून बोलावून पाहुण्यांनाही लाजवेल एवढे आदरातिथ्य करून आस्थेवाईकपणे केलेला संपूर्ण पाहुणचार नेत्र दीपक आणि स्वप्नवतच वाटत आहे.माझा माझ्या वरच विश्वास बसत नाही मी एक सामान्य कुटुंबातील अल्पसंख्याक समाजातील महिला असताना सुद्धा थेट मुख्यमंत्र्यांच्या सुविद्य पत्नीने माझा वाढदिवस मुख्यमंत्र्यांच्या शासकीय बंगल्यावर करावा हा माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय क्षण आहे अशा आपल्या भावना त्यांनी आनंदाश्रूनी व्यक्त केल्या.

## रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी, खा.सोनवणे यांनी चेन्नईतील बैठकीत मांडले महत्वपुर्ण मुद्दे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार,अन्न व सार्वजनिक वितरण विषयक संसदीय स्थायी समिती (२०२५-२६) अंतर्गत अन्नधान्य वाहतूक रेल्वे मार्गाद्वारे हालचाल अधिक कार्यक्षम करण्या बाबतआयोजित करण्यात आलेल्या बैठकीस खा. बजरंग सोनवणे यांनी चेन्नई येथे उपस्थिती लावली.बैठकीत रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी,असे महत्वाचे विविध मुद्दे मांडले.या बैठकीत भारतीय अन्न महामंडळ (एफसीआय),रेल्वे विभाग तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सखोल व सविस्तर चर्चा झाली. देशभरात अन्नधान्याची वेळेत व सुरक्षित वाहतूक कशी सुनिश्चित करता येईल,वाहतूक खर्चात कशी बचत करता येईल, तसेच रेल्वे नेटवर्कचा अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध वापर कसा करता येईल,याबाबत विविध मुद्द्यांवर सविस्तर विचारमंथन करण्यात आले.अन्नधान्याची साठवण,वाहतूक व वितरण प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी,विलंब व खर्च यावर उपाययोजना सुचविताना रेल्वेमार्गे वाहतूक अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला.विशेषत: सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी रेल्वे आणि एफसीआय यांच्यातील समन्वय वाढविणे, आधुनिक लॉजिस्टिक व्यवस्थेचा वापर,तसेच तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना राबविण्या बाबत चर्चा झाली.अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्या साठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.शेतकरी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अन्नधान्य पुरवठा साखळी अधिक मजबूत,पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले,अन्नधान्याची वेळेत व सुरक्षित वाहतूक ही देशाच्या अन्नसुरक्षे साठी अत्यंत महत्त्वाची असून,रेल्वेमार्गाचा प्रभावी वापर झाल्यास खर्चात बचत होऊन सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम होईल.या दृष्टीने संसदीय स्थायी समितीच्या माध्यमातून ठोस निर्णय व शिफारसी करण्यातयेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# संपादकीय

## बदलते तापमान



वर्ष बदलताना आलेल्या एका अनुभवाची आठवण ताजी आहे. काही बाबतीत काहीं सज्जनांचा कायम असलेला होरा पाहता याचं पुढं काय होणार? या जाणिवेनं मी अस्वस्थ होते. एका वर्षात काय बदलतं यावर भाष्य करणारे विद्वान पाहिले, की सांगावस वाटतं वर्षांचं काय घेऊन बसलात राव! पृथ्वीवर दर दिवशी, दर तासाला नव्या घडामोडी घडत असतात. यासाठी निसर्ग नियमावलीची खूप उदाहरण देता येतील. आतापर्यंतच्या काळात स्वभाव, मूड बदलण्याचे स्वातंत्र्य आणि तंत्र केवळ मानवाकडे होते. कोणे एकेकाळी जगावर त्याची हुकूमत होती; परंतु आजचं चित्र पूर्णतः वेगळं आहे. ते पाहून आपल्या तोंडचं पाणी पळालंय. आयुष्याला शिस्त लावणारा, आपल्या नियोजित चक्राला नियम लावणारा निसर्ग विक्राळ रूप धारण करतो. जनमानसाला हानी पोहोचवितो. पूर, महापूर, दुष्काळ तर कुठे भूस्खलनात किड्यामुंग्यांसारखी माणसं मरताना पाहून यातना होतात. दिवसेंदिवस निसर्गाची होत असलेली अवकृपा चिंतेचा विषय बनत चाललीय.निसर्गचक्राच्या नियमांना फाटा देत बदल घडवून आणणारे आपण निसर्गाच्या लहरीपणाला दूषण देत आहोत. प्रथम सरणारं वर्ष नवं आव्हान देऊन गेलं. वर्षारंभी पावसाने लावलेल्या हजेरीने संकटाची चाहूल लागली. गेल्यावर्षी पावसाचा कहर बघता पूर, महापूराने दाणादाण उडवली. त्या आठवणी ताज्या असताना जानेवारीत आलेला अवकाळी पाऊस कुरघोडी करायला, आपल्याला शहाणं करायला बिनबुलाए मेहमान सारखा आला हे विशेष अभ्यासण्यासारखे आहे. याची कारणं पाहता काही निष्कर्ष काढले. अभ्यास सांगतो, शहराची लोकसंख्या बेसुमार वाढते तेव्हा शहरातली झाडं कमी होत जातात. शिवाय शहराच्या आसपास असणारी शेतजमीन नापीक होत जाते. त्या जागी सिमेंट कॉंक्रीटचं जंगल वाढतं. अशातचं पोलादी, लोखंडी सळ्या माना वर काढतात. मागील बरींच वर्ष हे चित्र आपण पाहत आहोत. अशा अचंबित घटनांनी मेंदूच्या पार चिंध्या होतात. इमारतींसाठी काळ्याभोर डांबरी रस्तावर असलेला वाहनतळ, बाल्कनीची खोली, धातूच्या चौकटी तावदानावर काचा लावून उभ्या केलेल्या शोभिवंत खिडक्या म्हणजे वरवरच्या सौंदर्यासाठी करत असलेली निसर्गहानी, जी पर्यायाने आपल्या पायावर धोंडा मारण्याचे काम करते आहे. वनस्पती मातीपेक्षा जास्त काळ उष्णता साठवून ठेवणारे ल्युमिनियम, पोलादासारखे धातू सर्वात जास्त घातक मानले जातात. औद्योगिक विकासाच्या नावाखाली आपण सगळी मूल्य पायदळी तुडवत आहोत. यामध्ये गावचा विचार करता गावातल्या जमिनी आणि पिकांना मुबलक पाणीपुरवठा होतो; परंतु शहराच्या आसपास तसं होताना दिसत नाही. हिवाळ्यात शहराबाहेरील भागात तापमान जास्त असतं.काही वेळेस तापमानातला फरक दहा ते बारा अंश सेल्सिअस एवढा असतो. अशात शहर सभोवतालच्या परिसरात विशेषतः वाऱ्याच्या प्रवाहाच्या दिशेस पावसाचे प्रमाण वाढते. आजूबाजूस असलेल्या शेती, ग्रामीण परिसरापेक्षा शहरात उष्णता जास्त असते. याचं मुख्य कारण म्हणजे कॉंक्रिटीकरण आणि पोलादीकरण होय. जे पाण्याची वाफ होण्यामुळे गारव्याला प्रतिबंध करणारे धातूजन्य पदार्थ होत. ग्रामीण भागातील जमिनीवर सूर्याचे किरण पडले असता मातीसह वनस्पती, गळून पडलेली पान तापतात म्हणजे सूर्याकडून येणारी ऊर्जा शोषून घेतात. यामुळे पाण्याची वाफ होते. ती बाहेर पडते आणि पुन्हा हवेत मिसळते. यामुळे तापलेला पृष्ठभाग थंड व्हायला मदत होते; परंतु शहरात मोकळी माती, मुबलक झाडं नसल्याने सूर्यामुळे रस्ते, इमारती वारंवार तापतात. आसपास पाणी नसल्याने तापण्याची क्रिया वेगाने घडते. हवा तापल्याने पाण्यापेक्षा लवकर पोलाद कॉंक्रीट तापतात. त्यांचा काळा पृष्ठभाग उष्णता शोषून घेण्यात अग्रणी ठरतो. बहुतेक शहरात कुळकुळीत डांबरी रस्ते आणि त्या रंगाच्या इमारती पाहावयास मिळतात. अर्थातच त्या जास्त उष्णता शोषून घेतात. ती साठवून ठेवतात आणि हळूहळू वातावरणात सोडतात. अशातच शहराचे तापमान आजूबाजूच्या ग्रामीण भागापेक्षा वाढतं.मंडळी शहर आणि ग्रामीण भागात हा एवढाचं फरक आहे असं नाही, तर अभ्यासातून इतर गोष्टी पुढे आल्या आहेत. खूप विस्तारलेली शहरं ढग, पावसावरही परिणाम करतात. मोठ्या शहरात जमा झालेल्या उष्णतेमुळे स्थानिक हवामानात फरक पडतो. हवेत नवे प्रवाह निर्माण होतात. शहरावर सदैव कायमस्वरूपी कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो. कारण इथली हवा तापून वर जाते तिच्या जागी ग्रामीण भागातील कमी गरम हवा वर येते. ती तापते. पुन्हा वर जाते. मान्सून नसल्याने तिथे याचे वेगळे परिणाम जाणवतात. त्या ठिकाणच्या परिसरात अस्पष्ट आलेले ढग गोळा होतात आणि बाजूच्या ग्रामीण भागापेक्षा शहरावर अधिक प्रमाणात अधिक तीव्रतेचा पाऊस पडतो असे वॉशिंग्टन डीसीचा अभ्यास सांगतो. एकूणच मानवनिर्मित गोष्टींचा प्रभाव निसर्ग चक्रावर परिणाम साधतो हे आपल्या लक्षात येतं. खासगीकरण, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण या सगळ्याची उद्दिष्ट सफल होण्यासाठी असली तरी मानवनिर्मित सोयी सुविधांच्या गोष्टींचे समीकरण ताळमेळ राखू शकत नाही. तेव्हा अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देणं भाग पडतं. वेळ काळ ओळखून या सगळ्यांवर नियंत्रण ठेवले नाही तर ऋतूच्या वेळापत्रकात वारंवार बदल होत राहील आणि नैसर्गिक आपत्तीला सामोरं जावं लागेल. निसर्गाची कायम भिती बाळगत जगणं मुश्कील होईल. निसर्ग आपला मित्र या नात्याने मित्रत्वाच्या काही खुणा राखून ठेवल्या, तर उद्याचा उषःकाल वैभवसंपन्न होईल यात तिळमात्र शंका नाही.

# प्रबुद्ध समाज बनविण्यासाठी नीतीवान माणूस बनणे गरजेचे-प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड

### महाविहार धम्मभूमी शिवणी येथे पौष पौर्णिमा व सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

महाविहार धम्मभूमी शिवणी येथे प्रत्येक पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रम आयोजित केला जातो. ह्या पौष पौर्णिमेदिनी धम्मदेशना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड ( जे एन यु दिल्ली तथा अध्यक्ष मानवी हक्क अभियान) आपल्या मनोगतात म्हणाले की प्रबुद्ध समाज बनण्यासाठी नीतिवान माणूस बनावे लागेल.सम्यक ज्ञानाने व पालनाने समाज धम्माशील बनू शकतो. माता रमाईचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बद्दलचा जिव्हाळा, प्रेम जसे होते तसाच जिव्हाळा,प्रेम क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये होता. या महान मानवाचे व मातेचे स्मरण सतत ठेवून आपल्या जीवनात शिक्षण हे नीतीवान माणूस घडण्यासाठी कसे महत्त्वाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचितांच्या, बहुजनांच्या व सर्व स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचे प्रणेते आहेत. तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे लक्षात ठेव स्व उधारा बरोबरच समाजाचे व देशाचे हित कसे साध्य करता येईल ह्याकरिता सतत प्रयत्नशील असली पाहिजे असे आग्रेपणे प्रतिपादन केले.



कार्यक्रमास उपस्थित असलेले पूज्य भंते धम्मशील थेरो पु. पय्यावर्धन पु भंते बुद्धबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध प्रतिमेस पुष्प व दीप धुपाने पूजन करून सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सेवानिवृत्त सीईओ पी.व्ही. बनसोडे यांनी केले. व आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. संस्थेस अमेरिकेमध्ये उच्च पदावर कार्य करणारे प्रतीक देविदास तांगडे यांच्या आई-वडिलांनी संस्थेला आर्थिक दान दिले. तसेच भोजनदान देणारे सखाराम उजगरे व खीरदान देणारे राहुल सोनवणे तसेच आदिती तुकाराम कांबळे एम.बी.बी.एस.ही वैद्यकीय पदवी मिळवणाऱ्याचा संस्थेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. पूज्य भिक्खु पय्यावर्धन आपल्या मुख्य धम्मदेशनेत म्हणाले की जगाला शांतीचा, समतेचा,संदेश देणारे व दुःखमुक्तीचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्धांच्या जीवनात पौर्णिमेच्या दिवसाला अनन्य साधारण महत्व आहे. राजा बिंबीसाराने पौष पौर्णिमेला सम्यक संकल्प करून तथागतांना भिक्खु संघाकरिता वेळुवन दान केले होते. तरी तथागतांच्या उपदेशाप्रमाणे आपल्या जीवनात दानपारमीतेला उच्च स्थान देणे लक्षात घेऊन मानवाला, अति दुर्मिळ लाभलेले मानवी जीवन अरहंत पदाकडे वाटचाल करणे हे सर्वांच्या हिताचे आहे, अशी मोलाची धम्मदेशना देऊन वातावरण धम्ममय केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे व बहुसंख्य सदस्य, बीड शहरातील व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते राजू जोगदंड यांनी व्यक्त केले. पूज्य भंते धम्मशील थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने व शरणातयेणे कार्यक्रमाची सांगता झाली.

# आशा स्वयंसेविका,अंगणवाडी कार्यकर्ती आणि मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या भगिनींच्या हक्कांसाठी भारतीय जनता मजदुर संघाचे निवेदन अभियान

### आशा स्वयंसेविका अंगणवाडी कार्यकर्ती आणि मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या भगिनींना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार-भाऊसाहेब घोडके

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

देशभरात आशा स्वयंसेविका,अंगणवाडी कार्यकर्ती आणि मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या लाखो महिला भगिनी मागिल जवळपास ३० वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत पण कोणत्याही सरकारने या भगिनींना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला नाही. पण आता भारतीय जनता मजदुर संघाचे अध्यक्ष शांतप्रकाशजी जाटव यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा आणि सर्व सोयीसुविधा मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भारतीय जनता मजदुर संघाचे अध्यक्ष शांतप्रकाशजी जाटव यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांची भेट घेऊन देशभरात आशा स्वयंसेविका अंगणवाडी कार्यकर्ती आणि मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या लाखो महिला भगिनींच्या अडचणी आणि त्यांना मिळणारे तुटपुंजे मानधन या संदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी भारतीय जनता मजदुर संघाचे अध्यक्ष शांतप्रकाशजी जाटव यांना लवकरच या भगिनींना न्याय मिळवून देण्याचा निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले आहे.

बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब, देशाच्या महिला व बालविकास मंत्री, देशाचे अर्थमंत्री आणि कामगार मंत्री यांना भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, सोसियल मिडिया राजाध्यक्ष प्रमोद पुसरेकर, सोसियल मिडिया जिल्हाध्यक्ष किशोर देवा कुलकर्णी, लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे आणि विक्रम गायकवाड यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील आशा स्वयंसेविका अंगणवाडी कार्यकर्ती आणि मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या भगिनींच्या हक्कांसाठी निवेदन देण्यात आले आहे.




# मराठी पत्रकार परिषदेच्या नूतन पदाधिकारी यांचा एलआयसी कार्यालयात सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषदेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा भारतीय जीवन विमा निगम (ङखउ) चे इलीट मेंबर मनोहर कराड यांच्या कार्यालयात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील सामाजिक व पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी परळी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष किरण धोंड, तालुका कार्याध्यक्ष आत्मलिंग शेटे, शहर उपाध्यक्ष अभिमान मस्के, तालुका उपाध्यक्ष अनिल गायकवाड, कोषाध्यक्ष संदीप मस्के, परळी शहर कार्याध्यक्ष अनंत कुलकर्णी, परळी शहर कोषाध्यक्ष गणेश आंदोडे तसेच परळी शहर सचिव माणिक कोकाटे उपस्थित होते.




सत्कारप्रसंगी मनोहर कराड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली पत्रकारिता समाजासाठी दिशादर्शक असते. परळी पत्रकार परिषदेचे नूतन पदाधिकारी निर्भीड, सत्यनिष्ठ व लोकाभिमुख पत्रकारिता करतील, असा विश्वास आहे. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटनेने एकसंघपणे कार्य करावे तसेच समाजातील सर्वसामान्यांच्या अडचणी शासनदरबारी मांडण्याचे कार्य पुढेही प्रभावीपणे घडावे. असेही त्यांनी नमूद केले. नूतन पदाधिकाऱ्यांनी सत्काराबद्दल मनोहर कराड यांचे आभार मानत, परळी तालुक्यात पत्रकारितेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी, पत्रकारांच्या हक्कांसाठी व सामाजिक बांधिलकी जपत संघटनात्मक कार्य अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या सत्कार समारंभामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि सामाजिक क्षेत्रातील घटकांमध्ये सकारात्मक संवाद वृद्धिंगत होण्यास मदत होईल अशी भावना एल आय सी चे श्रीपत चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केली.

# तुम्ही AI ला विचारून ट्रिप प्लॅन करतायेत का?‘या’ ५ गोष्टी जाणून घ्या

दैनिक वादळ वार्ता

तुम्ही ट्रिप प्लॅन करण्याचा विचार करत असाल तर ही बातमी नक्की वाचा. आजकाल, आपल्यापैकी बहुतेक लोक आपल्या सुट्टीचे नियोजन करण्यासाठी ट्रॅव्हल एजंटकडे जाण्याऐवजी थेट AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) ची मदत घेतात. फक्त एक प्रॉम्प्ट द्या - मनालीसाठी ३ दिवसांची योजना करा - आणि डोळ्याच्या निमिषात, संपूर्ण वेळापत्रक तयार आहे. हे जितके सोपे वाटते तितकेच धोकादायक असू शकते. अर्थात, AI हे एक उत्तम टूल आहे, परंतु ते एक रोबोट आहे, त्या ठिकाणी भेट देणारा माणूस नाही. जर तुम्हीही तुमच्या पुढील सहलीचा प्लॅन पूर्णपणे AI वर आखत असाल तर हा लेख तुमच्यासाठी खास आहे. होय, तुमची बॅग पॅक करण्यापूर्वी, तुम्हाला या ५ गोष्टी माहित असणे आवश्यक आहे (AI सह ट्रिपचे नियोजन करण्यासाठी ५ टिप्स), अन्यथा तुमचा आनंदी प्रवास अडचणीत बदलू शकतो.



**कालबाह्य डेटा**

AI कडे नेहमीच रिअल-टाइम किंवा अद्ययावत माहिती नसते. तो तुम्हाला एखाद्या प्रसिद्ध संग्रहालयाला किंवा कॅफेला भेट देण्याची शिफारस करू शकतो जे सहा महिन्यांपूर्वी आधीच बंद झाले आहे. किंवा ते तुम्हाला सकाळी ९ वाजता निघायला सांगतात, जरी ती जागा सकाळी ११ वाजता उघडते. होय, AI बऱ्याचदा जुन्या डेटावर कार्य करते, म्हणून कोठेही जाण्यापूर्वी ऱ्क्षश्रश नकाशे किंवा त्यांच्या वेबसाइटवर नवीन वेळा आणि उघडण्याचे दिवस तपासण्याची खात्री करा.

**व्यस्त वेळापत्रक**

AI थकत नाही, परंतु आपण थकता. बऱ्याचदा, -ख कडक वेळापत्रक तयार करते जे मानवांना पूर्ण करणे अशक्य आहे. उदाहरणार्थ, सकाळी १० वाजता कुतुब मिनारला भेट द्या आणि सकाळी ११:३० वाजता इंडिया गेटवर पोहोचा. तो दिल्लीच्या रहदारीत आणि तुमच्या थकव्यात भर घालत नाही. म्हणून, जर आपणAI नुसार गेलात तर आपण सुट्टीचा आनंद घेणार नाही, परंतु कार्य पूर्ण करणारे मशीन राहील. आपल्या प्लॅन नेहमी थोडा मोकळा वेळ ठेवा.

**हवामान आणि स्थानिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे**

AI आपल्याला सांगेल की डोंगरावर जाण्यासाठी सर्वोत्तम वेळ ‘मे ते जून’ आहे, परंतु गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे दरडी कोसळली आहे की रस्ते बंद आहेत हे ते सांगू शकणार नाही. कारण त्याला वस्तुस्थिती माहित आहे, परंतु परिस्थिती नाही. सहलीची प्लॅन आखल्यानंतर, स्थानिक बातम्या किंवा सोशल मीडियावरील नवीन अद्यतने तपासण्यास विसरू नका.

**चुकीचे बजेट अंकगणित**

जर आपण AI ला विचारले की गोव्याच्या सहलीसाठी किती खर्च येईल?, तर ते आपल्याला अंदाजे रक्कम सांगेल, परंतु लक्षात ठेवा की शेअर बाजाराप्रमाणे विमान तिकिटे आणि हॉटेल्सच्या किंमती दर तासाला बदलतात. AI बऱ्याचदा जुन्या भाड्याच्या आधारे बजेट करते. जेव्हा आपण प्रत्यक्षात बुकिंगला जाता तेव्हा खर्च ३०-४० टक्के जास्त असू शकतो. म्हणून AI च्या बजेटचा विचार करा तो केवळ एक इशारा आहे, अंतिम सत्य नाही.

**विचित्र मार्ग**कधीकधी AI अशी ठिकाणे किंवा मार्ग सुचवते जे प्रत्यक्षात अस्तित्वात नाहीत किंवा खूप असुरक्षित आहेत. होय, तो आपल्याला एक शॉर्टकट देखील सांगू शकतो जो प्रत्यक्षात जंगलाच्या मध्यभागी जातो किंवा धोकादायक आहे. म्हणून, मार्ग ठरवताना नेहमीच विश्वासार्ह नकाशे आणि स्थानिकांच्या सल्ल्याला प्राधान्य द्या.

तंत्रज्ञानाचा वापर करणे शहाणपणाचे आहे, परंतु त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवणे मूर्खपणाचे ठरू शकते. आपल्या सहलीसाठी AI ला आपला ‘सहाय्यक’ बनवा, ‘बॉस’ नाही.

# नेकनूरसह चौसाळ्यात गो मांसाची खुली विक्री;पहिल्यांदाच पोलिसांची दृष्टी झाली वक्री

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूर गोमांस तस्करीचा अड्डा तर आहेच शिवाय चौसाळात देखील खुलेआम गोमांस विक्री केली जाते. मात्र पोलिसांच्या नाकावर टिच्चून हा धंदा सुरू असला तरी पहिल्यांदाच नेकनूर पोलिसांनी धाडसी कारवाई करत बुधवार बाजारात आलेलं अंदाजे ९० किलो गोमांस जप्त केलं आहे. पोलिसांच्या या कधी नवे ते कर्तव्यदक्षतेमुळे कौतुक केलं जात आहे. नेकनूर अतिशय संवेदनशील भाग म्हणून ओळखल जातं. गुरांचा आठवडी बाजार प्रसिद्ध असतानाच गोमांस तस्करी मध्ये देखील नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्याचप्रमाणे चौसाळा शहरात देखील गेल्या कित्येक महिन्यांपासून राजरोस गोमांसाची विक्री केली जात आहे. पोलिसांना याची सगळीच माहिती आहे.मात्र कायद्यापेक्षा मिळणारा हप्ता महत्त्वाचा त्यामुळे आज पर्यंत कारवाई कधीच झाली नाही. बुधवारी बाजारात देखील खुले आम विक्री सुरूच असते.पण चौसाळा शहरातून जात असलेल्या धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पवित्र प्रार्थनास्थळाच्या जवळच शुक्रवार मंगळवार आणि रविवारी गोमांसाची विक्री केली जाते. कायदा काय सांगतो यापेक्षा पोलिसांनी गोमांस विक्री व्यवसायाला आश्रय दिला तो गोरगरिबांची पोट भरावीत आणि रोजगारांच्या नवीन संधी निर्माण व्हाव्यात यासाठी त्यामुळे कधीच कारवाई केली गेली नाही. एखाद्याची चुकून तक्रार गेलीच तर वरवरची चौकशी चा ड्रामा करून त्या तक्रारीला केराची टोपली कशी दाखवायची याची हातोटी ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींना चांगलीच माहित आहे. त्यामुळे गोमांस विक्रीला कायद्याने बंदी असली तरी संविधानापेक्षा गोसावींनी राबविलेला कायदा मोठा आहे.मग कारवाई करायची कशाला माध्यमांनी तरी अवैध धंद्यांच्या गोष्टी प्रसिद्ध कराव्यात कशाला ? शेवटी चंद्रकांत गोसावी यांचा कार्यकाळ संपत आला आहे. विशेष म्हणजे ते पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे मर्जीतले आहेत.



गोसावींनी अनेक वेळा मला कंट्रोल ला टाका असं एसपींना अर्जव केलं मात्र दरवेळी त्यांच्या या मागणीला एस पीं नी दुर्लक्षित केलं. हीच बाब कायद्याचे तीन तेरा वाजवून सुव्यवस्थेला सूरुंग लावण्यासाठी महत्त्वाची ठरली मग कोणाच्या भावना दुखावल्या तरी चालेल पण मर्जीतला माणूस पदावर राहणं हे महत्त्वाचं मानलं गेलं. पोलीस अधीक्षक कर्तव्यदक्ष आहेत निष्कलंक आहेत हे वास्तव जरी असलं तरी माध्यमांच्या बातम्यांकडे ते करत असलेल्या दुर्लक्षामुळे व आपल्या सहकाऱ्यांवर असलेल्या अति विश्वासामुळे कायदा सुव्यवस्थेची घडी सगळी सडली आहे. अवैध धंदे नेकनूर परिसरात पोलिसाश्रयात चालत आहेत. पोलीस प्रमुख पदावर कोणीही बसलं तरी सामान्य जनतेने केलेल्या पापाची फळ त्यांना भोगायचीच आहेत असं म्हणून गप्प बसण्याची वेळ सध्या तरी आलेली आहे.आज बुधवारी चौसाळाचा आठवडी बाजार असल्याने पोलिसांनी बाजारात धाडसी कारवाई केली. याला धाडसीच म्हणावं लागेल कारण कारवाई आजपर्यंत कधीच झाली नव्हती ती अखेर झाली. पोलिसांनी बाजारात खुलेआम विक्री होत असलेलं अंदाजे ९० किलो गोमांस जप्त केलं. ज्या तीन चाकी रिक्षातून हे गोमांस आणला गेलं तो रिक्षा ही पोलिसांनी जप्त केला. तीन जणांना पोलिसांनी बाजारातून उचललं ही धाडसी कारवाई पोलीस उपनिरीक्षक आहेर साहेब, पो, हे, जायभाय, पो, हे, क्षीरसागर, विद्वान , यांच्यासह चौसाळा ठाणे अमलदार मुरुमकर, पो, हे, पुंडे, पो, ना, घुले यांनी केली आहे.

# बीडचा दारु बंदी विभाग झोपेच्या भरात

## चौसाळा बसस्थानकाशेजारी सुरु असलेल्या अवैध हातभट्टी दारुचा दुकानाला पाठबळ कुणाचे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा शहर हे अवैध हातभट्टी दारु विक्रीचे केंद्र बनले असुन चौसाळा बसस्थानकाशेजारीच पञ्याच्या शेडमध्ये अवैधरित्या हातभट्टी दारुची विक्री खुलेआमपणे होत असतानाही बीडच्या दारू बंदी विभागाचे अधिकारी माञ कुठल्याही प्रकारची कारवाई करताना दिसुन येत नसल्याने बीडच्या दारु बंदी विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह उभे राहत आहे. चौसाळा बसस्थानका शेजारीच पञ्याच्या शेडमध्ये केमिकल युक्त हातभट्टी दारुची खुलेआम पणे विक्री होत असल्याने अनेक गोरगरीब लोकांच्या संसाराची राख रांगोळी होताना दिसत आहे अनेक नवयुवक या हातभट्टी दारुच्या आहारी देखील गेले असल्यामुळे





नवयुवकाचे आरोग्य धोक्यात येत असुन बसस्थानका शेजारीच हा हातभट्टी दारुचा अड्डा असल्यामुळे येथिल प्रवाशी वर्गाला देखील तळीरामाचा ञास मोठ्या प्रमाणावर होत असुन रस्तयावरच लघुशंका करणे लज्जा उत्तपन्न होईल अशी भाषा वापरणे असे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले असुन हा हातभट्टीचा अड्डा बंद होणार का? झोपेच्या भरात असलेल्या बीडच्या दारु बंदी विभागाला जाग येणार का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारताना दिसुन येत आहेत

# घारगाव मध्ये महीलेच्या नाकातील मोरणी चोरुन मारहाण

## नेकनुर पोलीसाची कारवाई करण्यास टाळाटाळ वयोवृध्द महीला करणार आत्मदहन

दैनिक वादळ वार्ता

**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नेकनुर पोलीस स्टेशन हे सतत वादग्रस्त ठरत असुन याठिकाणी सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळणे कठीण झाल्याचे दिसुन येत आहे याबाबत अधिक माहीती अशी की, चौसाळा परिसरातील घारगाव येथील अजना दगडु बन(७८ वर्षे) ही वृध्द महीला मंदीरात झोपली असता याठिकाणी गणेश सपकाळ याने सदरील महीलेला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देत नाकातील सोन्याची मोरणी काढून घेतली व घटनेच्या ठिकाणाहून पळ काढला अशी फिर्याद चौसाळा पोलीस चोकीला गेल्या दीड महीन्यापुर्वी देण्यात आली होती पण चौसाळा पोलीस चोकीचे जमादार सचिन गर्जे हे फिर्यादी महीलेला दाबदडब करत असुन तसेच नेकनुर पोलीस स्टेशन चे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोसावी हे आरोपीला पाठीशी घालत असल्याचा आरोप अंजना बन या वयोवृध्द महीलेने केला असुन येत्या आठ दिवसात सदरील आरोपीवर कारवाई न झाल्यास दिनांक ११जानेवारी रोजी नेकनुर पोलीस स्टेशन समोर आत्मदहन करणार असल्याचा ईशारा अंजना बन यानी दिला असुन याची सगळी जिम्मेदारी नेकनुर पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व जमादार गर्जे यांची राहील असा इशारा या वयोवृध्द महीलेने दिला आहे.



# मौ.पेनूर (मोठे) येथे श्री सय्यद बाबा ऊर्सानिमित्त भव्य कुस्ती दंगल व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन


दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील मौजे पेनूर (मोठे) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री सय्यद बाबा ऊर्सानिमित्त भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले असून या यात्रेच्या निमित्ताने कुस्त्यांची प्रचंड दंगल तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रेची सुरुवात दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी गुरुवारी सायंकाळी ०७.०० वाजता भव्य संदल मिरवणुकीने होणार आहे. या संदल मिरवणुकीचे मानकरी माजी सरपंच रामदास पाटील गवते व प्राचार्य डॉ. अशोक पाटील गवते हे असून, भव्य मिरवणुकीने यात्रेला सुरुवात करण्यात येणार आहे. त्याच दिवशी रात्री आनंद लोकनाट्य तमाशा मंडळ, जळगाव तसेच इतर नामांकित तमाशा मंडळांचे लोकनाट्य तमाशाचे कार्यक्रम होणार आहेत. यात्रेनिमित्त सौ. कुंदा पाटील पुणेकर लोकनाट्य तमाशा मंडळ यांच्या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेतील मुख्य आकर्षण असलेल्या कुस्त्यांच्या फडाचे उद्घाटन शुक्रवार दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता होणार आहे. कुस्ती फडाचे उद्घाटन मा. ॲड. मुक्तेश्वरराव केशवराव धोंडगे (सहसचिव, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधार, राष्ट्रवादी काँग्रेस नेते, विधानसभा मतदारसंघ लोहा/कंधार) यांच्या शुभहस्ते तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.कुस्ती दंगलीत जिल्ह्यातील व राज्यातील नामांकित मल्ल सहभागी होणार असून शेवटच्या तीन कुस्त्यांचे बक्षीस अनुक्रमे पहिली कुस्ती – २००१ रुपये, दुसरी कुस्ती – ३००१ रुपये व अंतिम तिसरी कुस्ती – ५००१ रुपये असे ठेवण्यात आले आहे. त्यामुळे कुस्तीप्रेमींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.ही श्री सय्यद बाबा यात्रा हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानली जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व समाज घटकांच्या सहभागातून यात्रा शांततेत व उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.तरी परिसरातील सर्व पहेलवान बंधू, व्यापारी बंधू तसेच यात्रा प्रेमींनी या कुस्ती दंगलीसह धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.



# पत्रकार दिनी दत्ता खंदारे विशेष पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघांचे २५वे वर्ष आणि पत्रकार दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक भगवे वादळचे संपादक आणि पत्रकार दत्ता खंदारे यांना विशेष पुरस्कार देऊन मान्यवर व्यक्ती च्या हस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी मंचावर मुंबईचे लाडके व्यक्तिमत्व माजी नगरपाल (मुंबईचे शेरीफ) जगन्नाथराव हेगडे,जेष्ठ संपादक डॉ सुकृत खांडेकर,जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि कवयित्री सौ.जयश्री ताई संगितराव,संघाचे प्रमुख कार्यवाहक अशोक भोसले आणि संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर उपस्थित होते.

पत्रकार दत्ता खंदारे यांनी गेल्या २९वर्षाच्या कालावधीत विविध दैनिक, साप्ताहिक आणि मासिकांमध्ये सामाजिक समस्या मांडून त्या सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केले. तसेच प्रसिद्ध





झालेल्या बातम्यांची कात्रणे संबंधित खात्याकडे पाठवून समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा केला. पत्रकार दत्ता खंदारे यांना आजपर्यंत पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले असून पत्रकार दिनी त्यांना सन्मानित केल्या बद्दल महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघांचे आभार व्यक्त केले.

# पत्रकार बाळासाहेब कतुरे यांना पितृशोक; व्यंकटी आप्पा कतुरे यांचें निधन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा येथील पत्रकार बाळासाहेब उर्फ टिकाराम कतुरे यांना पितृशोक झाला असून त्यांचे वडील व्यंकटी उमाजी आप्पा कतुरे यांचे दि.



७-१-२०२६ रोजी सकाळी ८ वाजता दिर्घ आजारांनी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,चार मुले, एक मुलगी , सुना,जावई,नातू असा मोठा परिवार आहे ते लोहा येथील पत्रकार बाळासाहेब उर्फ टिकाराम कतुरे यांचे वडील होते.

कै. व्यंकटी अप्पा कतुरे शांत संयमी मनमिळावू स्वभावाचे वारकरी संप्रदायाचे होते ते अनेक धार्मिक सहली काढीत होते. त्यांच्या या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कै. व्यंकटी आप्पा कतुरे यांच्या पार्थिवावर दि.७ रोजी सायंकाळी ५ वाजता जुना लोहा येथील लोहा न.प. च्या सार्वजनिक लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी , माजी आमदार रोहिदास चव्हाण, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार, नगराध्यक्ष शरद पाटील पवार,माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी , माजी उपनगराध्यक्ष नगरसेवक केशवराव मुकादम, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण,यांच्यासहित सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील नागरिक गावकरी असा जनसमुदाय उपस्थित होता.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा मूकनायक पुरस्कार पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांना जाहीर!

## १६ जानेवारी रोजी मंत्री पंकजा मुंडें,माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषद यांच्या वतीने २०२६ चे दर्पण दिनानिमित्त मूकनायक पुरस्कार पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांना जाहीर करण्यात आला आहे, या परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निवडी करण्यात आली.पत्रकारितेच्या क्षेत्रात निःस्वार्थपणे कार्यरत राहून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी यावर्षी राज्यस्तरीय नामांकित वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांमध्ये कार्यरत असलेल्या सात पत्रकारांची विविध पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली, यामध्ये पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांचा देखील समावेश आहे.

पत्रकार सुकेशनी नाईकवाडे या टाईम्स ग्रुप च्य बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत मागच्या एक दशकापासून त्या बीड जिल्ह्यातील विविध विषयावर त्यांनी आपल्या कामाची छाप टाकली आहे. मागच्या वर्षी अमेरिका सरकारने त्यांना एक महिन्याच्या अभ्यास दौऱ्यावर देखील घेऊन गेले होते. त्यांनी एक महिन्याचा अमेरिकेतील अभ्यास दौरा यशस्वी रित्या पूर्ण करून त्या भारतात आल्या.ऊसतोड महिलांचे प्रश्न, एकल महिलांचे प्रश्न,स्त्री भ्रूण हत्या विषयक,बालविवाह विषयक, सेक्स कामगारांचे प्रश्न, शेतकरी आत्महत्या, एड्स जनजागृती विषयक स्टोरी, सर्वसामान्य नागरिकांच्य समस्या, प्रदूषण, वातावरण बदल, या विषयावर अनेक स्टोरी,मुलांच्या शिक्षणातील प्रश्न, दुष्काळ, तर समजत शोषित, पीडित, यांचा आवाज बनून त्याच्य समस्या शासन, प्रशासनासमोर सतत मांडण्याचे काम, राजकीय, सामाजिक,यासह विविध विषयावर सतत निर्भिडपणे आवाज उठवण्याचे काम पत्रकार सुकेशनी नाईकवाडे या बीड जिल्ह्यात करत आहेत. त्या महाराष्ट्र अंधश्रधा निर्मूलन समितीवर मागच्या एक दशकापासून पदाधिकारी म्हणून काम करत आहेत.त्यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदा महिला पत्रकारांची विंग तैय्यार केली त्यांचे नेतृत्व केले प्रदेश अध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्यांच्या कामाची दखल घेत अखिल भरतीय मराठी पत्रकार परिषद अंतर्गत परळी पत्रकार संघ यांच्या वतीने सन २०२६ या वर्षाचा मूकनायक पुरस्कार पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांना जाहीर करण्यात आला आहे.पत्रकारितेतील प्रदीर्घ योगदान, निर्भीड लेखन, समाजहिताची भूमिका आणि वंचितांचा आवाज बनण्याचे कार्य लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे.असल्याचेही सांगण्यात आले आहे.दर्पण दिना निमित्त १६ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे, अखिल भारतीय मराठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात येणार येणार आहे. या निवडीने पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांना सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहे.



# भटक्या श्वानांच्या प्रजनन नियंत्रणासाठी पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांची विशेष कार्यशाळा संपन्न

## जिल्ह्यातील ३० पशुधन विकास अधिकाऱ्यांना देण्यात आले शस्त्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्यातील ग्रामीण व नागरी भागांत भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची अमलबजावणी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार नंदुरबार येथे 'प्राणी प्रजनन नियंत्रण' विषयावर एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

०१ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील एकूण ३० पशुधन विकास अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. ग्रामीण भागात भटक्या श्वानांची समस्या गंभीर होत असल्याने, त्यावर तांत्रिक आणि शास्त्रीय पद्धतीने मात कशी करावी, याचे सविस्तर मार्गदर्शन या वेळी करण्यात आले. या उपक्रमासाठी 'नव समाज निर्माण बहुउद्देशीय संस्था, नंदुरबार' यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ही संस्था सध्या नंदुरबार नगरपरिषद क्षेत्रात श्वान प्रजनन नियंत्रण केंद्र यशस्वीपणे चालवत आहे.कार्यशाळेचे मुख्य आकर्षण म्हणजे श्वानांच्या नसबंदीसाठी केल्या जाणाऱ्या आधुनिक शस्त्रक्रियांचे थेट प्रात्यक्षिक. वडफळी (ता. अक्कलकुवा) येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. हर्षवर्धन पाटील यांनी उपस्थित डॉक्टरांना खालील दोन प्रमुख पद्धतींचे प्रशिक्षण दिले:
मादी श्वानांमधील प्रजनन क्षमता कायमस्वरूपी थांबवण्यासाठी केली जाणारी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया.नर श्वानांच्या नसबंदीसाठी वापरली जाणारी आधुनिक आणि सुरक्षित पद्धत.या शस्त्रक्रियांमुळे श्वानांची संख्या तर मर्यादित राहतेच, शिवाय त्यांच्यातील आक्रमकता कमी होऊन रेबीजसारख्या आजारांचा प्रसार रोखण्यास मदत होते. पशुसंवर्धन विभागाच्या या पुढाकारामुळे जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले आहे. यामुळे आता केवळ शहरातच नव्हे, तर दुर्गम ग्रामीण भागातही श्वान प्रजनन नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबवणे शक्य होणार आहे. प्राणी कल्याण आणि मानवी सुरक्षा यांचा समतोल साधण्यासाठी अशा कार्यशाळा मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# सातपुड्याच्या कुशीत आता हिरवे सोने उगवणार आदिवासी शेतकऱ्यांची ब्रोकली क्रांती

## पारंपरिक शेतीला मिळाली आधुनिक जोड

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या दुर्गम सातपुडा पर्वतरांगांमध्ये आता परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. वर्षानुवर्षे ज्वारी, बाजरी आणि मक्याच्या पारंपरिक पिकात अडकलेल्या या डोंगरदऱ्यात आता 'ब्रोकली' सारख्या परदेशी आणि उच्च मूल्याच्या भाजीपाल्याने एन्ट्री केली आहे. वाळंबा येथील आदिवासी शेतकऱ्यांनी घेतलेली ही झेप केवळ एका पिकाची लागवड नसून, सातपुड्यातील शेतीच्या समृद्ध भविष्याची 'नांदी' ठरली आहे.




सातपुड्याची माती आणि हवामान ब्रोकलीसाठी अत्यंत अनुकूल आहे. योग्य तंत्रज्ञान वापरल्यास आमचा आदिवासी शेतकरी केवळ देशांतर्गत नव्हे, तर जागतिक बाजारपेठेतही आपला माल पोहोचवू शकतो. –डॉ. वैभव गुर्वे (उद्यानविद्या तज्ञ)

दुर्गम भागात आधुनिक शेती शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर वाळंबा येथील प्रयोगशील शेतकऱ्यांनी कृतीतून दिले आहे. डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मदतीने हा प्रयोग यशस्वी झाला आहे. शास्त्रोक्त पद्धतीने रोपांची निवड, खत व्यवस्थापन आणि कीड नियंत्रणामुळे सातपुड्याच्या खडकाळ जमिनीत आज दर्जेदार ब्रोकली डोलत आहे.ब्रोकली लागवडीचे हे यश म्हणजे सातपुड्याचे थंड हवामान ब्रोकलीसाठी पोषक आहे, हे या प्रयोगाने सिद्ध झाले.त्याचबरोबर कोबी-फ्लॉवरपेक्षा ब्रोकलीला शहरांत मोठी मागणी आणि दामही जास्त मिळतो.या यशस्वी प्रयोगामुळे आता आदिवासी तरुणांना रोजगारासाठी स्थलांतर करण्याची गरज उरणार नाही.वाळंबा येथील या शेतात आता फक्त ब्रोकली नाही, तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास डोलत आहे. ब्रोकली पाठोपाठ आता इथला शेतकरी लेट्यूस, कोबी आणि फ्लॉवरच्या आधुनिक जातींकडे वळत आहे. हा बदल केवळ आर्थिक उत्पन्न वाढवणारा नसून, संपूर्ण परिसराचे जीवनमान उंचावणारा ठरणार आहे.

# नवापूर नगरपरिषदेवर 'दादा' गटाचे वर्चस्व उपनगराध्यक्षपदी नरेंद्र नगराळे तर अग्रवाल,देसले यांची स्वीकृत नगरसेवकपदी बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक निवडीची प्रक्रिया पार पडली असून यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने आपले वर्चस्व कायम राखत सर्व जागांवर बिनविरोध विजय मिळवला. उपनगराध्यक्षपदी नरेंद्र देविदास नगराळे यांची, तर स्वीकृत नगरसेवक म्हणून सीए वतनकुमार अग्रवाल व संगीता रमेश देसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने २३ पैकी २० जागा जिंकून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. याच पार्श्वभूमीवर दिनांक ७ रोजी सकाळी १० वाजून ३० मिनिटाला नामांकन प्रक्रिया पार पडली. त्यानंतर दुपारी १२ वाजता नगरपरिषदेतील वीर एकलव्य सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव होते, तर मुख्याधिकारी डॉक्टर मयुर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



सभेच्या प्रारंभी महाराष्ट्राचे माजी मंत्री स्व. सुरूपसिंग नाईक यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर निवडणूक निर्णय प्रक्रियेनुसार:
उपनगराध्यक्ष पदासाठी नरेंद्र नगराळे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड घोषित झाली.
स्वीकृत नगरसेवक पदासाठी उपजिल्हाधिकारी अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार प्राप्त प्रस्तावावर शिक्कामोर्तब करत वतनकुमार अग्रवाल आणि संगीता देसले यांची निवड जाहीर करण्यात आली.

निवडीची घोषणा होताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नगरपरिषद परिसरात फटाक्यांची आतषबाजी करत मोठा जल्लोष केला. पक्षाचे ज्येष्ठ नेते भरत गावीत व युवा उद्योजक धनंजय गावीत यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व नगरसेवकांनी नवनियुक्त सदस्यांवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

या निवडीमुळे नगरपरिषदेत सत्ताधारी गटाची स्थिती अधिक भक्कम झाली आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सभेच्या सांगतेनंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय कृषी महा विद्यालय परळी वैजनाथ येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

दि.६ जानेवारी २०२६ रोजी परळी वैजनाथ येथे शासकीय कृषी महा विद्यालय जिरेवाडी परळी वैजनाथ येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्स च्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य दिनेशसिंह चौहाण सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरीसर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग, डेव्हलपमेंट




रेग्युलेशन क्ट,कमोडिटी वइक्विटी मध्ये असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट, तसेच सेबीच्या सारथी पचे महत्त्व विशद करत मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी डा.बी.डी.मस्के सर यांनी विशेष प्रयत्न करत सूत्रसंचालन केले तसेच या कार्यक्रमास कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात दलित विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू; चौकशीच्या मागणी साठी दलीत मातंग संघर्ष समितीचा आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील जवाहर नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या दलित मातंग समाजातील एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.वसतिगृहात पंख्याला लटकलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह आढळून आला.या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून दलित समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या घटनेप्रकरणी सकल दलित(मातंग) समाज कृती समितीच्या वतीने केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.या निवेदनात सदर विद्यार्थिनीचा



मृत्यू आत्महत्येचा नसून संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला आहे.मृत विद्यार्थिनीला यापूर्वी शाळेतील काही कर्मचाऱ्यांकडून त्रास दिला जात असल्याचे आरोप करण्यात आला असून,याप्रकरणी सखोल व निष्पक्ष चौकशीची मागणी करण्यात आली आहे.यानिवेदनात नमूद करण्यात आले आहे की, घटनेनंतर प्रशासनाकडून अद्याप समाधानकारक माहिती देण्यात आलेली नाही.तसेच संबंधित विद्यालयातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यां वर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी,अशी मागणीही करण्यात आली आहे. विद्यार्थिनीच्या मृत्यू मागील सत्य बाहेर येण्यासाठी सीबीआय मार्फत चौकशी करावी, अशी मागणी देखील समाज कृती समितीने केली आहे.दरम्यान,जर येत्या सहा दिवसांत योग्य ती चौकशी व कारवाई झाली नाही,तर केज शहर बंद ठेवून तसेच रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दलित समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.या घटनेमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.यावेळी दलीत मातंग समाजातीलयुवक,महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# धडगाव तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट; पोलिसांकडून दोन ठिकाणी छापे, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक असलेली कोणतीही पदवी किंवा अधिकृत प्रमाणपत्र नसताना, केवळ आर्थिक फायद्यासाठी लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या बनावट डॉक्टरांविरुद्ध धडगाव पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. गेल्या २४ तासांत धडगाव शहर आणि काकडदा परिसरात पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवाया करत बोगस डॉक्टरांचा पर्दाफाश केला असून मोठ्या प्रमाणात औषधसाठा जप्त केला आहे.

धडगाव शहरातील डीडीसी बँकेसमोर बनावट पदवीच्या आधारे क्लिनिक चालवून रुग्णांची फसवणूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कांतीलाल पावरा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी ४,३५ च्या सुमारास छापा टाकला. या कारवाईत कांतीलाल सोनवणे (वय ५०, राहणार वडफळ्या) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ११ हजार ५५१ रुपये किमतीची औषधे आणि वैद्यकीय साधने जप्त करण्यात आली आहेत.

दुसऱ्या एका कारवाईत पोलिसांनी काकडदा गावातील शिवराम पाडवी यांच्या घरात सुरू असलेल्या अवैध दवाखान्यावर छापा टाकला. या ठिकाणी तपसकुमार लक्ष्मण सरकार (मूळ राहणार पश्चिम बंगाल) हा तरुण पदवी नसतानाही लोकांवर उपचार करताना आढळला. या ठिकाणाहून पोलिसांनी ५८ हजार ५४६ रुपये किमतीचा औषधसाठा आणि वैद्यकीय साहित्य हस्तगत केले आहे. तोतयागिरी करून लोकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अटकेत असलेल्या आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(३), ३१९(२), ३३६(२), ३४०(२) सह महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम कलम ३३, ३३ ए, ३५ आणि ३६ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा प्रवृत्तींविरुद्ध कोणतीही गय केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार (शहादा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली धडगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप, पोलीस हेड कॉन्स्टेबल अरुण सैंदाणे, डेविड पाडवी व त्यांच्या पथकाने केली आहे.नागरिकांनी कोणत्याही डॉक्टरकडे उपचार घेताना त्यांची अधिकृत पदवी आणि नोंदणीची खात्री करावी. आपल्या परिसरात असा कोणताही संशयास्पद प्रकार आढळल्यास तातडीने तालुका वैद्यकीय अधिकारी किंवा पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा.असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077